<u>विशेष दिवाणी दावा क्र.२५१/२०२२ मध्ये निशाणी २९ खाली आदेश</u>

(राजेंद्रकुमार शिंदे वि. जयश्री शिंदे व इतर)

[CNR No. MHSO12-000721-2022]

वादीने सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश ३९, नियम १ व २ प्रमाणे प्रतिवादींविरुध्द तुर्तातूर्त मनाईचा आदेश मिळणेसाठी दाखल केलेला आहे. त्याचे असे कथन आहे की, त्याने सदरचा दावा वाटपाकरीता दाखल केला आहे. दावा मिळकतीपैकी काही मिळकती एकत्र कुटुंबाच्या उत्पन्नातून कुटुंबातील सदस्यांच्या नांवे खरेदी केल्या आहेत. दावा मिळकती या वादी व प्रतिवादींच्या एकत्र हिंदू कुटुंबाच्या मालकी कब्जे वहिवाटीच्या मिळकती आहेत व त्यांच्यामध्ये अद्याप सरस निरस मानाने अगर कोणत्याही पध्दतीने वाटप झालेले नाही. वादी व प्रतिवादी दावा मिळकतीचा एकत्रात उपभोग घेत आहेत. वादीचा दावा मिळकतीत १/६ हिस्सा आहे. असे असताना अलिकडे प्रतिवादी दावा मिळकतीच्या हक्क पत्रकी असलेल्या नोंदीचा गैरआधार घेऊन वादीच्या हिताविरुध्द बोलत आहेत व वादीला शेती सुधारणा करण्यास विरोध करत आहेत. दाव्याचे कामकाज चालू असताना प्रतिवादींनी दावा मिळकतीतील माती उचलणे, बांधाची नासधूस करणे, झाडे तोडणे, वगैरे कृत्य चालू केले आहेत. प्रतिवादी क्र.६ ने दावा मिळकत गट नं.२२७/२ मधील माती विकण्याचा व ती दुसऱ्या जमिनीत टाकण्याचा प्रयत्न दिनांक ०३/०७/२०२३ रोजी चालविला होता. त्यास वादीने विरोध केला असता त्याने त्याच्यासोबत भांडण केले व तात्पुरते माती उचलणे बंद केले. त्यानंतर त्याने दुपारी गट नं.२३७/३ व १८०/१/ड या जमिनीतील तीन लिंबाची व एक पिंपळाचे झाड तोडून परस्पर घेऊन गेला व बाकी जमिनीत असणारे झाडझुडूप तोडण्याच्या व माती विक्री करण्याच्या तयारीत आहे. असे झाले तर वादीचे अपरिमीत नुकसान होणार आहे व जमिनीची प्रत खालावणार आहे. प्रतिवादी क्र.६ दावा मिळकती

पैकी त्याच्या नावे असलेल्या जमिनीच्या उताऱ्याचा आधार घेऊन बँकेचे कर्ज काढून दाव्याला विलंब करण्याच्या तयारीत आहे. तसेच प्रतिवादी घरजागा विक्री करण्याच्या तयारीत आहेत. त्यामुळे त्यांच्या विरुध्द मनाई हुकूम देण्यात यावा.

२)　　　　प्रतिवादी क्र.१ व २ यांनी निशाणी ३५ अन्वये सदर अर्जास जबाब देऊन अर्जातील संपूर्ण कथने नाकारली आहेत. त्यांचे पुढे असे कथन आहे की, दावा मिळकतीपैकी गट नं.१८२/१/३ क्षेत्र ८१ आर, गट नं.८४४ पैकी प्लॉट नं.५३ व ५४, गट नं.५२७ पैकी प्लॉट नं.१८ पैकीचे क्षेत्र व गट नं.१८०/१ या जमिनी प्रतिवादी क्र.१ च्या स्वतंत्र खरेदी मालकी वहिवाटीच्या आहेत. सदर मिळकतींशी वादी व प्रतिवादी क्र.५ ते ८ यांचा कसल्याही प्रकारे हक्क व अधिकार नाही. दावा मिळकती वडिलार्जीत आहेत, असे वादीने खोटे नमूद केले आहे. सदर मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी क्र.५ ते ८ यांची कधीही कब्जे वहिवाट नव्हती. सदर मिळकती वगळता दाव्यात नमूद मिळकतींमध्ये प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचा हक्क हिस्सा मिळणेचा अधिकार आहे. करीता अर्ज नामंजूर करण्याची त्यांनी विनंती केली. इतर प्रतिवादींनी सदर अर्जास जबाब दाखल केला नाही.

३)　　　　दोन्ही पक्षांच्या परिस्पर विरुध्द कथनांवरुन खालील मुद्दे माझे विचारार्थ उपस्थित झाले असून सदरचे मुद्दे व त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसहित खालीलप्रमाणे आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादीने प्रथम दर्शनी वाद सिध्द केला काय? | नकारार्थी. |
| २. | सोयीचे संतुलन वादीच्या बाजुने जाते, असे वादी सिध्द करतो काय? | नकारार्थी. |

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ३. | मनाई हुकूमाची दाद दिला नाही तर वादीचे अपरिमीत नुकसान होईल, असे वादी सिध्द करतो काय? | नकारार्थी. |
| ४. | काय आदेश? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## – कारणमिमांसा –

४) वादीतर्फे निशाणी ४ लगत कागदपत्रे दाखल करण्यात आली आहेत. मी दोन्ही पक्षांतर्फे युक्तिवाद ऐकला आहे.

**मुद्दा क्र.१ ते ४ बाबत –**

५) सर्व मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्याने एकत्रित कारणमिमांसे करीता घेण्यात आले आहेत. वादीतर्फे विधीज्ञ श्री. एस.व्ही. जाधव यांनी दाव्याप्रमाणे युक्तिवाद करुन पुढे असा युक्तिवाद केला की, सदरचा दावा हा वाटपाकरीता व मनाई हुकूमाकरीता दाखल केला आहे. दावा मिळकतीत त्रयस्थ व्यक्तींचे हक्क निर्माण करु नये म्हणून सदरचा अर्ज दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.६ ने दावा मिळकतीतील माती काढली, झाडे तोडली व त्यांची विक्री केली. प्रतिवादी मिळकतीवर कर्ज काढत आहेत. दावा मिळकत कोणत्याही प्रतिवादीची स्वकष्टार्जीत नाही. मिळकतीत अद्याप हक्क हिस्से ठरायचे आहेत. दावा मिळकती वडिलोपार्जीत आहेत किंवा नाही, हे पुराव्यानंतर सिध्द होईल. करीता अर्ज मंजूर करण्याची त्यांनी विनंती केली.

६) प्रतिवादी क्र.१ ते ४ व ५ ते ७ यांच्या विधीज्ञांनी असा युक्तिवाद केला की, दावा मिळकती वडिलोपार्जीत नाहीत व त्या स्वकष्टार्जीत मिळकती आहेत.

प्रतिवादींनी नोकरीच्या उत्पन्नातून त्या खरेदी केल्या आहेत. खरेदीनुसार झालेल्या फेरफार नोंदी वादीने आव्हानीत केल्या नाहीत. प्रतिवादींच्या मालकीच्या मिळकतीत त्यांच्या इच्छेनुसार प्रतिवादींना काहीही करण्याचे अधिकार आहेत. प्रतिवादी क्र.१ चे पती मिलीटरीमध्ये नोकरी करत होते. त्याच्या उत्पन्नातून त्यांनी मिळकती खरेदी केल्या आहेत. वादी व प्रतिवादी सन १९९६ पासून वेगळे राहत आहेत. अर्ज मंजूर केला तर प्रतिवादींचे नुकसान होईल. करीता अर्ज नामंजूर करण्याची त्यांनी विनंती केली.

७) वादी व प्रतिवादी यांनी दावा मिळकतींच्या स्वरुपाबाबत परस्पर विरुध्द कथने केली आहेत. वादीच्या कथनानुसार दावा मिळकती वडिलोपार्जीत आहेत. या उलट प्रतिवादींच्या कथनानुसार त्या त्यांच्या स्वकष्टार्जीत मिळकती आहेत. दावा मिळकतीचे नेमके स्वरुप काय आहे, हे पुराव्यानंतर निश्चित होणार आहे. वादीने सदरचा अर्ज दाखल करुन प्रतिवादींनी जमिनीतील माती उचलू नये, विक्री करु नये, वृक्षतोड करु नये व मिळकतींचे हस्तांतर करु नये व कर्जबोजे निर्माण करु नयेत, असा तुर्तातूर्त मनाई हुकूम मागितला आहे. प्रतिवादी कोणत्या तारखेला, कोणत्या व्यक्तिला, कोणत्या प्रकारे, कोणती मिळकत विक्री करत आहेत, हे वादीने अर्जात नमूद केले नाही. तसेच प्रतिवादींनी दावा मिळकतीतील माती काढली, झाडे तोडले व बँकेचे कर्ज घेत आहेत, या बाबत वादीच्या तोंडी कथनाशिवाय इतर कोणताही पुरावा प्रथम दर्शनी दाव्यात दाखल केलेला नाही. केवळ वादीच्या कथनावरुन सदर बाब घडली आहे, असे गृहीत धरता येणार नाही. थोडया वेळाकरीता जर दावा मिळकती वडिलोपार्जीत आहेत, हे वादीचे कथन खरे आहे असे गृहीत धरले तर, सर्व प्रतिवादी हे सह हिस्सेदार होतील व त्यानुसार त्यांच्या विरुध्द मनाई हुकूम देता येणार नाही. प्रतिवादी अर्जात नमूद कृत्य करीत आहेत व त्यामुळे वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे, या बाबी

वादीने प्रथम दर्शनी सिध्द केल्या नाहीत. याचाच अर्थ असा की, वादीने प्रथम दर्शनी वाद व अपरिमीत नुकसान, ही तत्वे शाबीत केली नाहीत. वादीच्याच कथनानुसार दावा मिळकती वडिलोपार्जीत व अविभक्त आहेत, त्यामुळे सोयीचे संतुलन केवळ वादीच्या बाजूने जाते, हे वादीने सिध्द केले नाही. करीता मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर नकारार्थी देऊन मुद्दा क्र.४ च्या अनुषंगाने खालील प्रमाणे अंतिम आदेश पारीत करण्यात येतो.

**– आदेश –**

निशाणी २९ चा अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात येतो.

दिनांक – ०४/०१/२०२४

( **रेवती म. कंटे** )
सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,
बार्शी.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | | |
|---|---|---|---|
| a) | Name of the Stenographer | : | R.P. Sakinal, Steno. Grade-2 |
| b) | Court | : | Jt. C.J.S.D. and A.C.J.M., Barshi. |
| c) | Date of Judgment/Order | : | 04.01.2024 |
| d) | Judgment/Order signed by the Presiding Officer on | : | 04.01.2024 |
| e) | Judgment/Order uploaded on | : | 04.01.2024 |